महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३५४ वा | दिनांक : ०८/१२/२०२५ | वार : सोमवार

## सरकार लोकशाहीविरोधी : भास्कर जाधवांचा आरोप



**नागपूर :** हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महाविकास आघाडीने आक्रमक पवित्रा घेत महायुती सरकारच्या कारभाराचे अक्षरशः वाभाडे काढले आहेत. सरकारच्या 'एककल्ली, मनमानी आणि भ्रष्ट' कारभाराचा तीव्र निषेध करत विरोधकांनी मुख्यमंत्र्यांनी आयोजित केलेल्या पारंपरिक चहापानावर बहिष्कार टाकला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार आणि ठाकरे गटाचे भास्कर जाधव यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत सरकारवर जोरदार हल्ला चढवत, या सरकारने भ्रष्टाचाराच्या आणि मनमानीच्या सर्व सीमा ओलांडल्याचा आरोप केला.

"विरोधी पक्षनेता नसणे हा संविधानाचा अवमान" चहापानाचे निमंत्रण नाकारताना भास्कर जाधव यांनी सरकारवर लोकशाहीचा गळा घोटल्याचा आरोप केला. ते म्हणाले, विरोधी पक्षनेतेपदाची दोन्ही सभागृहातील पदे रिक्त ठेवणे हा संविधानाचा अवमान आहे. हे पद केवळ परंपरा नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संवैधानिक पद आहे. विरोधी पक्षनेतेपदासाठी १० टक्के सदस्यसंख्येची अट असल्याचा सरकारचा दावा 'संपूर्ण खोटा' असल्याचे सांगत, त्यांनी याबाबत प्रधान सचिवांच्या लेखी उत्तराचा दाखला दिला.

राज्यात दोन उपमुख्यमंत्री हे पद संविधानात नसतानाही केवळ राजकीय तडजोडीसाठी निर्माण केले गेले आणि आज सत्तेतील तिन्ही पक्ष भ्रष्टाचाराच्या स्पर्धेत उतरले आहेत, अशी टीका भास्कर जाधव यांनी केली. विरोधी पक्षांच्या आमदारांना निधी न देऊन या सरकारने अर्धा महाराष्ट्र विकलांग केला आहे, असा घणाघात त्यांनी केला. तसेच, राज्यात गुन्हे घडले की मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांकडून आरोपींना लगेच 'क्लीन चिट' दिली जाते, ज्यामुळे कायद्याचा धाक उरलेला नाही, असेही ते म्हणाले.

रोहित आर्या प्रकरण आणि सभापतींवर टीका कायदा आणि सुव्यवस्थेवर बोट ठेवताना भास्कर जाधव यांनी रोहित आर्या कंत्राटदार प्रकरणाचा उल्लेख केला. या प्रकरणात पुरावे नष्ट करण्यासाठीच सरकारने गोळीबार घडवून आणल्याचा खळबळजनक आरोप त्यांनी केला. यावेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्यावरही निशाणा साधण्यात आला. लोकशाही नको आणि मनुस्मृती हवी, हीच त्यांची मानसिकता आहे, असा टोला लगावत, गेली अडीच वर्षे सभापतीपद रिक्त ठेवणाऱ्यांनी आता परंपरांचे दाखले देऊ नयेत, असे खडे बोल जाधव यांनी सुनावले.

## उद्धव ठाकरे वैफल्यग्रस्त त्यांना टोमणे मारणे हाच एक उद्योग राहिलाय - संजय शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर :** उद्धव ठाकरे हे वैफल्यग्रस्त झाल्याने त्यांना टोमणे मारणे आणि टीका करणे हाच एक उद्योग राहिला आहे. महायुतीमध्ये आम्ही काय सुरू आहे, याच्याशी तुम्हाला काय करायचे आहे? तुम्ही तुमचे पाहा ना? असा टोला शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट यांनी उद्धव ठाकरेंना लगावला आहे.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, तुमचे अस्तित्व काय आहे यावर तुम्ही बोलले पाहिजे. स्वत:च पक्ष सोडून इतरांच्या पक्षात नाक खूपसण्याचे कारण काय? असा सवाल शिरसाट यांनी केला आहे. आम्ही कसे काम करतो हे महाराष्ट्रातील जनतेनी पाहिले आहे. त्यांना माहिती आहे की आम्ही कसे काम करतो. तुमच्या सांगण्यामुळे काही फरक पडतो असे समजू नका.

संजय शिरसाट म्हणाले की, उद्धव ठाकरे दिल्लीमध्ये भेटी घेण्यासाठी चालले आहेत. त्यांना तिथे जाऊन गळा भेट घेत आम्हाला पदरात घ्यावे असे काहीही म्हणावे. पण असे बोलून स्वत:चे हसू का करुण घेतात. आमच्या पक्षाची चिंता तुम्हाला काबर आहे तुमच्या सांगण्याने पक्ष चालेल का? आमच्या नेत्यांना कसा पक्ष चालवायचा हे समजत नाही का? आमचा पक्ष कोणी चालवत नाही आमचा पक्ष एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष अजित पवार चालवतात असे म्हणत शिरसाट यांनी उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर दिले आहे.

उद्धव ठाकरें म्हणाले की, महायुतीमधील तीनही पक्षाचे नेते एकच आहेत. तिन्ही पक्षाचं चिन्ह, नाव, वेगवेगळं असलं तरी त्यांचा मालक एकच आहे. त्यांच्या (भाजप) या बी टीम आहेत. मी काही दिवसांपूर्वी एक शब्द वापरला होता की ॲनाकोंडा. आता या ॲनाकोंडाचा प्रत्येय महायुतीमधील पक्षांना यायला लागलेला आहे. त्यामुळे या दोन्ही पक्षांना ॲनाकोंडा गिळल्याशिवाय राहणार नाही. विरोधी पक्षनेतेपद व उपमुख्यमंत्रीपद या दोन गोष्टी आहेत. कारण, विरोधी पक्षनेतेपद हे सरकारने द्यायलाच हवे. आम्ही पहिल्याच अधिवेशनात तशी मागणी केली होती. एक वर्ष होऊन गेले. त्यात सरकारने जाहिरातींशिवाय दुसरे काहीच केले नाही. कदाचित विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाला वर्षभर विरोधी पक्षनेता नसण्याची ही पहिलीच वेळ असावी. हे सरकार विरोधी पक्षनेतेपदाला का घाबरत आहे? हे अत्यंत मजबूत सरकार आहे. त्यांना दिल्लीचाही पाठिंबा आहे.

## वांद्रे आणि वरळीतील राड्यानंतर मातोश्रीवर खलबते : उद्धव ठाकरेंनी बोलावली बैठक



**मुंबई :** मुंबईत गेल्या काही दिवसांत वांद्रे आणि वरळी येथील सेंट रेजिस हॉटेलमध्ये भाजप आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात झालेल्या राड्यानंतर आता पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. कामगार क्षेत्रात भाजपची वाढती घुसखोरी रोखण्यासाठी आणि त्यांना जशास तसे उत्तर देण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी रविवारी दुपारी 'मातोश्री'वर अखिल भारतीय कामगार सेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली.

या बैठकीत त्यांनी भाजपची मक्तेदारी मोडून काढण्याचे आदेश देतानाच, पक्षातील काही ज्येष्ठ नेत्यांची चांगलीच शाळा घेतली. "भारतीय कामगार सेना ही कुणाचीही वैयक्तिक जहागिरी नाही, त्यामुळे एकसंघ राहून काम करा," अशा कडक शब्दांत ठाकरेंनी नेत्यांचे कान टोचले आहेत.

राज्यातील विविध भागांतील कामगार सेनेच्या युनिट्सचे पदाधिकारी दुपारी १२ वाजता मातोश्रीवर दाखल झाले होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी कामगार सेनेच्या अंतर्गत कारभारावर बोट ठेवले. कामगारांच्या हितासाठी आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायासाठी कामगार सेनेने आपला आवाज अधिक तीव्र केला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. संघटनेत गटबाजी खपवून घेतली जाणार नाही, भारतीय कामगार सेना म्हणून सर्वांनी एकजूट दाखवावी, असा सज्जड दमही त्यांनी भरला.

शिवसेना ठाकरे गटाचा कणा मानल्या जाणाऱ्या कामगार सेनेचे जाळे मुंबईसह राज्यभरातील हॉटेल्स, विमानतळ, मोठे कारखाने आणि कंपन्यांमध्ये पसरलेले आहे. मात्र, अलीकडच्या काळात भाजपनेही स्वतःच्या कामगार संघटना स्थापन करून शिवसेनेच्या या बालेकिल्ल्याला सुरुंग लावण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. भाजपच्या या रणनीतीला शह देण्यासाठी आता स्वतः उद्धव ठाकरे यांनी कामगार सेनेच्या कामकाजात लक्ष घालण्यास सुरुवात केली आहे.

आजच्या बैठकीत त्यांनी पदाधिकाऱ्यांच्या अडचणी समजून घेतल्या. तसेच, जिथे भाजप कामगार संघटना घुसखोरी करतील किंवा दादागिरी करतील, तिथे त्यांना जोरदार प्रत्युत्तर देण्याचे आणि पलटवार करण्याचे आदेश उद्धव ठाकरे यांनी दिले आहेत. भाजपचे मनसुबे हाणून पाडण्यासाठी आता कामगार सेनेने जुन्या आक्रमक शैलीत काम करावे, असा स्पष्ट संदेश या बैठकीतून देण्यात आला आहे. आगामी काळात मुंबई महापालिका आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कामगार सेनेची ही बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०८ डिसेंबर २०२५


## डॉ. आंबेडकर हे संविधान निर्माते फक्त नसून राष्ट्रनिर्माते - प्रा. नागसेन कांबळे





**उमरगा (प्रतिनिधी) :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ विशिष्ट समाजाचे नेते नसून ते आपल्या भारत राष्ट्राचे खऱ्या अर्थाने निर्माते आहेत.१९४७ अगोदर आपला भारत खंडप्राय उपखंडामध्ये राजेशाही व सरंजामशाही मधे विभागलेला होता.या विखुरलेल्या देशाला एकसंघपणे बांधण्याचे काम आपल्या संविधानाने केले. भारताला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करून देण्याचे महत्त्वाचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 69 व्या महापरिनिर्वाण दिनाच्या आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रविराज पवार हे होते प्रा. नागसेन कांबळे हे आपल्या प्रभावी व्याख्यानात पुढे म्हणाले की "विद्यार्थी मित्रांनो डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कुण्या एका समाजाचे नसून ते देशाचे नेते आहेत.तेजस्विता तपस्विता आणि तत्परता हे त्यांच्या व्यक्तिमत्वातील विशेष गुण होते ग्रंथासाठी स्वतःचे घर बांधणारा हा जगातील एकमेव माणूस आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू होते .जलनीती, आर्थिक नीती, न्यायनीती ,कृषी तज्ञ ,कामगार नेते ,व स्त्री पुरुष समानता असे चौफेर मांडणी करणारे आणि व्यक्तिमत्व लाभलेले महामानव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. दरवर्षी आपण त्यांना सहा डिसेंबरला वंदन करतो. अभिवादन करतो. परंतु त्यांचे विचार आणि त्या विचारांपासून आपण कोणतीही प्रेरणा घेत नाही. विद्यार्थ्यांसाठी बाबासाहेबांनी अतिशय महत्त्वाचा सल्ला दिलेला होता. तो आपण लक्षात घेतला पाहिजे.विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेत फक्त ज्ञानार्जन केले पाहिजे. या विद्यार्थी अवस्थेत त्यांनी राजकारणात पडू नये. ज्ञानाची लालसा असणे हीच विद्यार्थ्यांची प्राथमिक गरज असली पाहिजे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रचंड संघर्षातून आपले शिक्षण घेतले .अनेक ग्रंथ लिहिले .भारतीय संविधान लिहून त्यांनी सबंध भारतीयावर एक प्रकारे उपकारच केले आहेत. स्त्रियांना न मागता मतदानाचा अधिकार व माणूस म्हणून त्यांना पुरुषाबरोबरचे सर्व अधिकार बहाल केले ,प्रा.नागसेन कांबळे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य,विचारसरणी,तसेच देशातील सर्व घटकासाठी त्यांनी केलेल्या क्रांतिकारी कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली.विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श घेण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक रविराज पाटील यांनी विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श घेऊन बहुआयामी व्यक्तिमत्व घडविण्याचे आवाहन केले.प्रत्येक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करण्याचा संकल्प करण्यास प्रेरित केले.प्रारंभी प्रमुख पाहुणे प्रा.नागसेन कांबळे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना सर्व उपस्थित विद्यार्थ्यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी उपमुख्याध्यापक सत्यवान भालेराव ,पर्यवेक्षक अविनाश भालेराव ,प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक बसवराज पुरंत हे आवर्जून उपस्थित होते. या महापरिनिर्वाण दिनाच्या कार्यक्रमाचे सविस्तर प्रास्ताविक श्रीकृष्ण कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.कल्लया स्वामी यांनी केले .तर कार्यक्रमाचे आभार श्री तुकाराम माने यांनी मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री अनिल बनसोडे यांनी केले. कार्यक्रमाला शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. राष्ट्रगीता नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## तिफण कविता महोत्सवातील कवि-संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रतिभा खैरनार



**कन्नड (अरुण थोरात) :** त्रैमासिक तिफण, तिफण वाचक चळवळ आणि भाषा , साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड यांच्या वतीने कन्नड तालुक्यातील बालखेड येथे राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवाचे आयोजन ४ जानेवारी रोजी प्रसिद्ध कवी नारायण सुमंत यांच्या अध्यक्षते खाली करण्यात आले आहे. राजेंद्र दिघे हे उदघाटक म्हणून उपस्थित राहाणार आहेत. या कविता महोत्सवात विविध कार्यक्रम संपन्न होतात. त्यातील कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध कवयित्री प्रतिभा खैरनार (नांदगाव जि. नाशिक ) यांची निवड करण्यात आली असून त्यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन रंगणार आहे. प्रतिभा खैरनार या स्त्रीवादी जाणिवेने लेखन करणाऱ्या नव्या पिढीतील महत्वाच्या कवयित्री आहेत. त्यांचे तू मृगजळ जणू, बाभूळ फुलं, पडसावल्या, आणि वंशावळीच्या प्राचीन सरीतून हे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांना अनेक राज्य पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. प्रतिभा खैरनार यांच्या निवडीबद्दल त्यांचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, ॲड. कृष्णा जाधव, स्वागताध्यक्ष अशोकसिंग शेवगण, कविता महोत्सवाचे संयोजक डॉ. शिवाजी हुसे, संयोजन समितीचे डॉ. रामचंद्र झाडे, प्रविण दाभाडे, अरुण थोरात, ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, संदीप ढाकणे, भिमराव सोनवणे, श्रीराम दापके, भरत सोनवणे, संदीप वाकडे, अनिता राठोड, शुभदा देवरे, गितांजली गजबे, सुभाष काळे, सुरेश औटे, का. का. थोरात, शिवनाथ गायकवाड, प्रा. सूर्यकांत सांभाळकर, प्रा. रमेश वाघचौरे, अमोल मोकाशे, अजय दवंडे, प्रकाश शहरवाले, ब्रम्हगिरी गोस्वामी, आदींनी अभिनंदन केले आहे.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०८ डिसेंबर २०२५


## विधिमंडळ अधिवेशनात बोलू दिले जात नाही : राजेश राठोड



**छत्रपती संभाजीनगर :** महायुती सरकारला राज्यात विरोधी पक्ष आणि विरोधी पक्षनेता नकोच आहे. विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी मागील अधिवेशनात विधान परिषदेत चक्क विरोधी पक्षनेत्यासमोरचा माईक काढून तो मुख्यमंत्र्यांसमोर ठेवला, असा आरोप काँग्रेसचे विधान परिषदेतील प्रतोद राजेश राठोड यांनी दिव्य मराठी डिजिटलशी बोलताना केला आहे. विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर, प्रलंबित विरोधी पक्षनेतेपदावरून त्यांनी सरकारवर तोफ डागली.

राजेश राठोड यांनी गेल्या अधिवेशनातील प्रसंग सांगताना सभापतींच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, सभागृह नेता आणि विरोधी पक्षनेता यांना समान दर्जा असतो. मात्र, मागील काळात विधान परिषदेत विरोधी पक्षनेत्याला बोलता येऊ नये म्हणून त्यांच्यासमोरील कायम सुरू असणारा माईक काढून केवळ सभापतींच्या नियंत्रणाखालील माईक ठेवण्यात आला. तर, दोन्ही 'ऑन' असणारे माईक मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. उजवा आणि डावा असा भेद सभापतींना करता येत नाही, तरीही विरोधकांना प्रश्न मांडू दिले जात नाहीत.

सभागृहातील गोंधळावर भाष्य करताना आमदार राजेश राठोड म्हणाले की, आम्ही प्रश्न विचारण्यासाठी हात वर करून थकतो, पण संधी दिली जात नाही. आम्ही बोलायला लागलो की बेल वाजवली जाते किंवा सत्ताधारी पक्षाचे आमदार गोंधळ घालून आमचा आवाज दाबतात. हे लोकशाहीसाठी घातक आहे.

आमदार राजेश राठोड म्हणाले की, विधानसभेत शिवसेनेचे संख्याबळ जास्त असल्याने तिथे त्यांना विरोधी पक्षनेतेपद मिळणार असेल, तर विधान परिषदेत काँग्रेसचे संख्याबळ अधिक असल्याने हे पद काँग्रेसलाच मिळावे. जर शिवसेनेला विधान परिषदेचे पद हवे असेल, तर महाविकास आघाडीत सामंजस्याने बदल करून काँग्रेसला विधानसभेतील पद देण्यात यावे. विरोधी पक्षनेतेपदासाठी काँग्रेसमध्ये सतेज पाटील यांच्या नावाला सर्वांची पसंती आहे. मात्र, पक्षश्रेष्ठींनी मराठवाडा किंवा विदर्भाचा विचार केल्यास माझ्यासह प्रज्ञा सातव, धीरज लिंगडे किंवा अभिजित वंजारी यांच्या नावांचाही विचार होऊ शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

राजेश राठोड म्हणाले की, महाराष्ट्राच्या संसदीय परंपरेत कधीही विरोधी पक्षनेता नाही असे घडले नाही, याची आठवण करून देताना राठोड म्हणाले की, गेल्या वर्षभरापासून विधानसभेत आणि ऑगस्टपासून विधान परिषदेत हे पद रिक्त असणे हे महाराष्ट्राच्या वैभवाला शोभणारे नाही. विरोधी पक्षनेता हा शेतकरी, कष्टकरी, महिला आणि तरुणांचा आवाज असतो. सभापतींनी संख्याबळ पाहून त्वरित काँग्रेसच्या नेत्याची या पदावर घोषणा करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## कालिकादेवी विद्यालयात, 'लोकनेते मा. जयदत्त (अण्णा) क्षीरसागर' यांच्या वाढदिवसानिमित्त बक्षीस वितरण संपन्न




**शिरूर कासार :** कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.)जि.बीड येथे माजी मंत्री तथा आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव,लोकनेते मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त 'बक्षीस वितरणाचा कार्यक्रम' घेण्यात आला.तसेच शाळेतील सर्व स्पर्धक विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.प्रारंभी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशव भांगे,ज्येष्ठ नगरसेवक मा.अर्जुनदादा गाडेकर पाटील,ज्येष्ठनेते मा.गोविंदराव पाटील गाडेकर, माजी सभापती सतीश काटे,नगरसेवक डॉ.भगवानराव सानप, पत्रकार गोकुळ पवार, सतिश केदार यांच्या हस्ते लोखनेत्या स्व.केशरबाई (काकू) क्षीरसागर व लोकनेते स्व.सोनाजीराव(नाना)क्षीरसागर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी अध्यक्षीय भाषणातून सांगितले की, मा.जयदत्त(अण्णा)क्षीरसागर साहेब हे सर्वांनाच सोबत घेऊन राजकारण व समाजकारण करतात.त्यामुळे अण्णासाहेब हेच बीड जिल्ह्याचे विकासाभिमुख व सक्षम नेतृत्त्व आहेत.तद्वतच स्व.केशरबाई काकूंचा वसा आणि वारसा पुढे घेऊन जाण्याचं काम मा.जयदत्त अण्णाचं करताना दिसतात.कारण काकू प्रमाणेच मा.अण्णासाहेब सुद्धा समाजातील गोरगरीब, कष्टकरी, कामकरी, दीन-दलित,बहुजन समाजातील अपेक्षित,दुर्लक्षित व वंचित घटकातील लोकांची तळमळ करतांना दिसतात.म्हणून अण्णासाहेबांचे हे कार्य महान स्वरूपाचे आहे.असे गौरवउद्गार काढून मा. अण्णासाहेबांना वाढदिवसाच्या लाख-लाख शुभेच्छा दिल्या.तसेच दै.पुण्यनगरीचे पत्रकार गोकुळ पवार,व प्रा.महादेव महारुद्र डोंगरे यांनी अण्णासाहेबांच्या वाढदिवसानिमित्त मनोगते व्यक्त केली व स्पर्धक विद्यार्थ्यांना आणि अण्णासाहेबांना शुभेच्छा दिल्या. मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. तेव्हा स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना शालेय साहित्याचे विविध मान्यवरांच्या हस्ते बक्षीसांचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ.आत्माराम झिंजुर्डे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.विनोद गलांडे यांनी केले.याप्रसंगी उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे तसेच सर्व कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## बंदुकीच्या गोळयांच्या 'ब्रास कप'ची 'समृद्धी'वर चोरी



**दौलताबाद :** समृद्धी महामार्गावर दौलताबाद पोलिस ठाण्याच्या हद्दीत संरक्षण मंत्रालयाच्या आयशर ट्रकमधून बंदुकीच्या गोळ्या तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या 'ब्रास कप'चे ४२ नग चोरट्यांनी लंपास केले. हा प्रकार ४ डिसेंबर रोजी घडला. या प्रकारामुळे घाबरलेल्या चालक व त्याच्या सहकाऱ्याने बुलढाणा जिल्ह्यातील बिबी पोलिस ठाण्याच्या हद्दीत गेल्यावर 'डायल ११२'वर संपर्क साधून चोरीची माहिती दिली. त्यावरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

संरक्षण मंत्रालयाच्या अंबरनाथ येथील आयुध निर्माणीमधून जबलपूरकडे मनीष नेवंदराम लोहानी (३८, रा. अंबरनाथ वेस्ट, जि. ठाणे) हे ३ डिसेंबरला आयशर ट्रकमधून (एमपी ०४ जीबी ४४६४) २८० गोण्यातून ब्रास कप घेऊन निघाले होते. ४ डिसेंबरला दुपारी समृद्धीवरील चॅनल क्रमांक ४५१ जवळ चालकाच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे ट्रक थांबवला होता. दरम्यान, ट्रकच्या मागून आवाज आला. त्या वेळी चालकासह मागे जाऊन पाहिले असता एक व्यक्ती ताडपत्रीची दोरी कापून वर चढत होता. त्याच्यासोबतची दुसरी व्यक्ती दुचाकीवर होती. आम्हाला पाहून ते पळून गेले, असे तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकाराने गोंधळून गेल्याने बुलढाणा जिल्ह्यात गेल्यावर त्यांनी डायल ११२ वर संपर्क साधला. त्यानंतर बिबी पोलिस स्टेशनचे हवालदार राजेश सरदार यांच्यासह चालकाने ट्रक दौलताबाद येथे आणला. तेथे पोलिसांच्या सूचनेवरून ट्रकमधील मालाची मोजणी केली असता ७१ हजार ५६८ रुपयांचे ब्रास कपचे ४२ नग गायब असल्याचे दिसले. त्यावरून पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०८ डिसेंबर २०२५

## निरीक्षण, अनुकरण, अनुभवातून विद्यार्थी शिकतात - शिवाजी काकडे



**कन्नड (अरूण थोरात) :** जागतिक पातळीवर होणारे बदल लक्षात घेता आपल्याला स्वतः्त बदल करावे लागेल.तुमच्या प्रत्येकात काही ना काही करण्याच्या क्षमता असतात फक्त त्या ओळखून त्यानुसार वाटचाल करावी असे प्रतिपादन शिवाजी काकडे यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या संकल्पनेतून दशसूत्रीतील संस्कार मूल्यांची रुजवणूक म्हणजेच आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी आयोजित पालक- शिक्षक सहविचार सभेत बोलताना व्यक्त केले. याप्रसंगी घेण्यात आलेल्या कार्यक्रमाची सुरूवात महामानवांच्या प्रतिमेचे श्री.काकडे यांच्या हस्ते पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी पुढे बोलताना श्री.काकडे म्हणाले की, दिवसेंदिवस विद्यार्थ्यांच्या आरोग्यसंबंधी सवयी बदलत आहे. चटपटीत पदार्थांकडे आकर्षित होऊन पौष्टिक आणि सकस आहाराकडे दुर्लक्ष होताना पालकाने विशेष लक्ष द्यावे. आयुष्यात तुम्हाला मोठे व्हायचे असेल तर वाईट सवयी टाळाव्या. मोबाईलमध्ये गरजेप्रमाणे लक्ष देताना पालकांनी देखील आपल्या मुलांसोबत रोज मैत्रीपूर्ण चर्चा करावी. शारीरिक क्षमता विकसित करताना सकस आहार, अभ्यासाच्या वेळेचे नियोजन, सर्वांचा आदर या महत्त्वपूर्ण बाबींकडे लक्ष द्यावे असेही सांगण्यात आले. आज आयोजित दशसूत्री चर्चेत गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रदान करणे,स्पर्धात्मक,आरोग्यक्षम, आय टी तंत्रस्नेही, कौशल्यपूर्ण स्वावलंबित विद्यार्थी घडवणे,आनंददायी, नाविन्यपूर्ण व रचनात्मक शिक्षण मुलींची सुरक्षितता, महिला सन्मान, आत्मविश्वास जागृती, स्व अभिव्यक्ती प्रोत्साहन, स्वगुण चालना,नवशिक्षण पद्धती आदींवर विद्यार्थी - पालक - शिक्षक सहविचार चर्चा झाली. यावेळी पालक यांच्यासह ज्ञानविकास विद्यालयाचे मुख्याध्यापक, सहशिक्षकवृंद, शालेय वाहनचालक मालक यांची उपस्थिती होती

## जाहीर प्रगटन

जा.क्र.२०२५/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यू नोंद/सिआर-४४
उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड
दिनांक ०३/११/२०२५

सर्व जनतेस जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार सुरेश सोनाजी उघडे राहणार खोलापूर ता.कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

ग्रामपंचायत कार्यालय खोलापूर ता कन्नड जि छत्रपती संभाजी नगर

जन्म-मृत्यू अधिनियम १९६१चे कलम १३ (३) अन्वये उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ/ ऍड. मार्फत/ स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगा चे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांची मुलगी कल्याणी सुरेश उघडे ची जन्म दिनांक १३-१२-२०२० रोजी खोलापूर ता कन्नड येथे जन्म झालेला आहे अर्जदार यांच्या मुलगी ची जन्म दिनांक १३-१२-२०२० रोजी खोलापूर ता कन्नड जि छत्रपती संभाजीनगर येथे.जन्म झालेला आहे अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्मा/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे सदर जाहीर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस सुचित करण्यात येते की,अर्जदार यांची मुलगी कल्याणी सुरेश उघडे यांचा जन्म दिनांक १३-१२-२०२० रोजी खोलापूर ता कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 24/12/2025 रोजी मा.न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणाचाही आक्षेप उजर/आक्षेप/तक्रार न आल्यास अर्जदारास दिनांक १३/१२/२०२० रोजी रा खोलापूर ता कन्नड जि छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतर आलेला उजर/आक्षेप/तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

करिता दिनांक ०३/११/२०२५ रोजी सदर जाहीर प्रकटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे

**स्वाक्षरित**
**(संतोष गोरड)**
उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

## म्हणीचा गोडवा

एका हाताने
वाजत नाही टाळी
हमेशा गोटे पडती
खोट्याच्या कपाळी

हिरा तो हिरा
गार ती गार
शहाण्या माणसाला
शब्दांचा मार

सुंभ जळते पण
पीळ जळत नाही
टाकीचे घाव सोसल्याशिवाय
देवपण येत नाही

चोर सोडून
संन्याशाला फाशी
दोन्ही घरचा पाहुणा
राहीला उपाशी

जावे त्यांच्या वंशा
तेव्हाच कुठे कळे
आंधळा मागतो एक डोळा
देव देतो दोन डोळे

भाषेचा गोडवा
वाढला म्हणीमुळे
जेव्हा पुस्तक वाचाल
तेव्हाच कुठे कळे



**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता. महागाव
जि. यवतमाळ
मो. 9011559106

## सूर्य मावळता झाला

झाली संध्याकाळ आता
सूर्य मावळता झाला
बाप शेतकरी माझा
निघे घराच्या वाटेला

त्याची सारी लगबग
घरासाठीच चालली
पंढरीच्या विठोबाला
आस त्याचीच लागली

रानातून गावाकडे
गाई वासरं चालले
लक्ष थवे पाखरांचे
खोप्याकडे झेपावले

सोनसरी किरणांनी
रानोमाळ उजळले
दूर क्षितिजापल्याड
सूर्यबिंब हरवले

आली रात्र हळुवार
हाती चांदण घेऊन
चंद्र निघाला ऐटीत
ढगोबांना रे खेटून

अशी रात चांदण्याची
गप्पा मारत सरली
पूर्व दिशेला सूर्याची
पुन्हा किरणे उगली

**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड
मो.९४०३३८४८८९*



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०८ डिसेंबर २०२५


## स्मृती मंधाना-पलाश मुच्छलचे लग्न रद्द:स्मृतीने लिहिले- हे इथेच संपवू इच्छिते



भारतीय महिला क्रिकेटपटू स्मृती मंधाना आणि गायक पलाश मुच्छल यांचे लग्न रद्द करण्यात आले आहे. हे जोडपे २३ नोव्हेंबर रोजी लग्न करणार होते. हळदी आणि संगीत समारंभ आधीच पार पडले होते आणि लग्नाच्या मिरवणुकीची तयारी सुरू होती. दरम्यान, स्मृती मंधानाच्या वडिलांना हृदयविकाराचा झटका आल्यानंतर लग्न पुढे ढकलण्यात आले.

लग्न पुढे ढकलल्यानंतर, सोशल मीडियावर विविध अफवा पसरू लागल्या. पलाश मुच्छलने स्मृतीला फसवले आणि त्याचे लग्नाच्या कोरिओग्राफरशी संबंध असल्याचे दावे करण्यात आले. दरम्यान, स्मृतीने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवरून लग्नाशी संबंधित सर्व फोटो डिलीट केले.

स्मृतीने तिच्या पोस्टमध्ये लिहिले आहे की, "गेल्या काही आठवड्यांपासून माझ्या वैयक्तिक आयुष्याबद्दल खूप अटकळ बांधली जात आहे, म्हणून मला वाटले की आता बोलण्याची वेळ आली आहे. मी खूप खाजगी व्यक्ती आहे आणि माझी गोपनीयता राखू इच्छिते, परंतु लग्न आता रद्द करण्यात आले आहे हे स्पष्ट करणे महत्त्वाचे आहे."

मला हे प्रकरण इथेच थांबवायचे आहे आणि मी तुम्हा सर्वांना विनंती करतो की हे प्रकरण आणखी वाढवू नका. कृपया सध्या दोन्ही कुटुंबांच्या वैयक्तिक जीवनाचा आदर करा आणि आम्हाला आमच्या भावनांवर प्रक्रिया करण्यासाठी आणि पुढे जाण्यासाठी थोडा वेळ द्या.

मला वाटते की आपण सर्वांनी एका उच्च ध्येयासाठी प्रयत्न केले पाहिजेत आणि माझ्यासाठी ते नेहमीच माझ्या देशाचे प्रतिनिधित्व करत आले आहे. मला भारतासाठी शक्य तितके खेळायचे आहे, सामने जिंकायचे आहेत आणि संघासाठी ट्रॉफी घरी आणायची आहेत. ते माझे ध्येय आहे आणि ते पुढेही राहील."

पलाशने त्याच्या इन्स्टा स्टोरीमध्ये लिहिले आहे की, "मी माझ्या आयुष्यात पुढे जाण्याचा आणि माझ्या वैयक्तिक नात्यांपासून दूर जाण्याचा निर्णय घेतला आहे. माझ्यासाठी ही खूप कठीण परिस्थिती होती, विशेषतः जेव्हा लोक निराधार अफवांवर इतक्या सहजपणे प्रतिक्रिया देतात. माझ्यासाठी सर्वात पवित्र असलेल्या गोष्टींसोबत अशा गोष्टी घडताना पाहून खूप दुःख होते. हा माझ्या आयुष्यातील सर्वात कठीण काळ आहे आणि मी माझ्या विश्वासांवर खरे राहून शांत आणि आदराने ते हाताळेन."

मला खरोखर आशा आहे की आपण एक समाज म्हणून अज्ञात स्त्रोतांकडून आलेल्या असत्यापित बातम्या आणि गप्पांवर आधारित त्वरित निर्णय घेऊ नये. आपले शब्द कधीकधी आपल्या समजण्यापलीकडे जखमा देऊ शकतात.

आम्ही या बाबींवर विचार करत असताना, जगभरातील अनेक लोकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. माझी टीम खोटी आणि बदनामीकारक माहिती पसरवणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करेल. या कठीण काळात माझ्या पाठीशी उभे राहिले आणि मला पाठिंबा देणाऱ्यांचे मी मनापासून आभार मानतो.

लग्न पुढे ढकलल्यानंतर सोशल मीडियावर अनेक प्रकारच्या अफवा पसरू लागल्या. पलाश मुच्छलने स्मृतीसोबत फसवणूक केली असून त्याचे नाव वेडिंग कोरिओग्राफरशी जोडले गेले, असा दावा करण्यात आला. याच दरम्यान, स्मृतीने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवरून लग्नाशी संबंधित सर्व फोटो काढून टाकले होते.

पलाश १ डिसेंबर रोजी संत प्रेमानंद महाराजांना भेटायला पोहोचला होता. वृंदावनमधील केलीकुंज आश्रमात इतर भक्तांप्रमाणे पलाशही मास्क लावलेला दिसला. त्याने एकांत संवादादरम्यान 'राधा-राधा' नामजप केला.

सोमवारी स्मृतीसोबतचे लग्न पुढे ढकलल्यानंतर, पलाश मुछाल दुसऱ्यांदा सार्वजनिकरित्या दिसला. यापूर्वी त्याला विमानतळावर ऑल-ब्लॅक लूकमध्ये पाहिले गेले होते.

अलीकडेच पलाश आणि स्मृतीच्या लग्नाच्या नवीन तारखेबद्दल असा दावा केला जात होता की दोघे ७ डिसेंबर रोजी विवाहबंधनात अडकणार आहेत. या लग्नात फक्त दोन्ही कुटुंबातील सदस्य उपस्थित राहतील, परंतु स्मृतीचा भाऊ श्रवण मंधानाने हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला. तो म्हणाला, “मला या अफवांबद्दल कोणतीही माहिती नाही. सध्या लग्न पुढे ढकलले आहे.”

# बोधी दिन: मानवजागृती आणि सामाजिक परिवर्तनाचा मार्ग



**ज**गाच्या इतिहासात काही दिवस फक्त प्रसंग म्हणून नाही तर बदलांचे बिंदू म्हणून ओळखले जातात. अशा दिवसांपैकी एक म्हणजे ८ डिसेंबर बोधी दिन होय. हा दिवस केवळ बौद्ध धर्मीयांसाठी अध्यात्मिक महत्त्वाचा नाही, तर संपूर्ण मानवजातीसाठी विचार, विवेक, करुणा आणि सामाजिक न्यायाची स्मृती जागवणारा दिवस आहे. कारण याच दिवशी राजकुमार सिद्धार्थांनी बोधी वृक्षाखाली ध्यानधारणा करत करत जीवनातील अनंत दुःख, विषमता, युद्ध, सत्ता, लोभ व अन्यायाच्या संकटांचे मूळ शोधत अखेर ज्ञानप्राप्ती केली आणि ते गौतम बुद्ध झाले. म्हणूनच बोधी दिन ही केवळ धार्मिक घटना नाही, तर मानवजातीच्या सामाजिक, नैतिक, तत्त्वज्ञानिक आणि मानवतावादी प्रवासातील एक अविस्मरणीय मैलाचा दगड आहे.मानव समाजाच्या उत्क्रांतीत अनेकदा युद्धांनी, एकाधिकारशाहीने, साम्राज्यवादाने आणि सामाजिक जात-धर्म-वंशभेदांनी दहशत निर्माण केली. आपल्याला प्रश्न असा पडतो की मानवाला मानव बनविणारा मार्ग कोणता? शक्तीचा की प्रज्ञेचा? तर बुद्धांचे उत्तर होते की शांततेचा, नैतिकतेचा, करुणेचा, समानतेचा आणि मध्यममार्गाचा. म्हणूनच समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता बोधी दिन हा केवळ आध्यात्मिक ज्ञानाचा उत्सव नाही तर मानवी समाजाला न्याय्य, समतामूलक आणि नैतिक दिशेने प्रवास करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे.इतिहासात पाहिल्यास, ज्ञानप्राप्तीपूर्वीचा सिद्धार्थ हा केवळ एखाद्या राज्यातील राजकुमार नव्हता; तो एक संवेदनशील निरीक्षक होता. मृत्यू, रोग, वृध्दत्व आणि दारिद्र्य या चार सत्यांनी त्याला हादरवले. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून हे प्रश्न आजही तेवढेच जिवंत आहेत. जग प्रगत झाले असे म्हणवले जाते, पण भूक, युद्ध, सामाजिक असमानता, मानसिक तणाव, जातीय संघर्ष, धार्मिक कट्टरता आणि उपभोगवाद-नफा-आधारित जीवनपद्धतीने मानवाला पुन्हा असहाय्य बनवले आहे. अशा काळात बोधी दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.गौतम बुद्धांच्या शिकवणीत धम्म हा कर्तव्य, नैतिकता आणि विवेक होता. त्यामुळे धम्म म्हणजे कर्मकांड, जप-तप, पुरोहिती किंवा अंधश्रद्धा नव्हे, तर समाजाला समता आणि न्याय मिळवून देणारी प्रेरणा. म्हणूनच बुद्ध म्हणतात की "अप्प दीपो भव" म्हणजेच स्वतःचा दीप स्वतः बना. समाजशास्त्रीय अर्थ असा की, प्रत्येक व्यक्तीने आत्मबोध, विचारमंथन आणि नैतिक धैर्य विकसित केले पाहिजे; कारण परिवर्तन हे बाहेरून लादले जाणारे नसते तर ते अंतर्मनातून जन्मते.बोधी दिन मानव स्वभावातील तीन प्रमुख प्रवृत्तींकडे निर्देश करतो, त्यामध्ये पहिली प्रवृत्ती म्हणजे लोभ म्हणजेच अत्यंत मिळवण्याची इच्छा होय. आधुनिक समाजशास्त्र सांगते की बाजारव्यवस्था भौतिक समाधान देऊ शकते, पण ती आध्यात्मिक आणि भावनिक शांती देऊ शकत नाही. दुसरी प्रवृत्ती आहे द्वेष होय. आजही आपण पाहतो की राजकारणात, धर्मांमध्ये, समाजवर्गांमध्ये, डिजिटल माध्यमात आणि राष्ट्रांमध्ये लोकांमध्ये मतभेदांपेक्षा तिरस्कार वाढत आहे. बुद्ध म्हणतात की द्वेषाने द्वेष संपत नाही; प्रेमानेच तो संपतो. तिसरी प्रवृत्ती म्हणजे अज्ञान होय. दडपशाही, भेदभाव, हिंसा आणि कट्टरतेचा मूलाधार. समाजातील अन्याय, जातीय दमन, पितृसत्ता, वर्ण-जातिवाद, आर्थिक शोषण, पर्यावरणाचा विनाश यांची मुळे मानवी अज्ञानात आणि अविचारी कृतीत आहेत. बोधी म्हणजे हे अज्ञान दूर करण्याची प्रक्रिया होय.म्हणूनच बोधी दिन मानवाला स्मरण करून देतो की ज्ञान म्हणजे माहिती नव्हे, तर जागृती. आज इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता, जागतिकीकरण आणि डिजिटल संपर्कामुळे माहितीचे जग फुलले आहे; पण शांती, श्रद्धा, मानवता आणि संयम कोठेतरी हरवले आहेत. म्हणूनच बुद्धांचे तत्त्वज्ञान समाजशास्त्रीय प्रश्न विचारते की आपण अधिक प्रगत झालो आहोत, की फक्त अधिक गुंतागुंतीचे आणि अस्थिर झालोआहोत?बोधी दिन आपल्याला न्यायाच्या, समतेच्या, संवादाच्या आणि अहिंसेच्या नव्या मूल्यांना स्वीकारण्याचे आह्वान देतो. बुद्धांनी लोकशाहीचा पाया मांडताना संघ, विचारस्वातंत्र्य, मतभेदांचा सन्मान आणि सार्वत्रिक करुणा या तत्त्वांना केंद्रस्थानी ठेवले. आजच्या लोकशाही व्यवस्थेत या मूल्यांची पुन्हा गरज भासते. कारण विचारविनिमयाऐवजी संघर्ष, सहिष्णुतेऐवजी कट्टरता आणि मानवी हक्कांऐवजी नियंत्रणवाद वाढताना दिसतो आहे. म्हणूनच बोधी दिन आपल्याला सांगतो की समाजाची उभारणी वर्चस्वावर नाही, तर सहजीवनावर होते.याच संदर्भात बुद्धांनी समाजातील सर्वात उपेक्षित घटक म्हणजेच महिला, शूद्र, वंचित, संघर्षग्रस्त आणि पीडित घटकांमध्ये मानवी समानतेचे तत्त्व पहिल्यांदा प्रत्यक्षात आणले. समाजातील प्रत्येक जण जात, लिंग, वर्ग, धर्म, व्यवसाय किंवा जन्माच्या आधारे समान आहे हे तत्त्व सामाजिक न्यायासाठी आजही महत्त्वाचे आहे.बोधी दिन हा वर्तमानातील मानसिक आरोग्याच्या संकटांनाही उत्तर देतो. आधुनिक जीवनशैली वेगवान, स्पर्धात्मक, तणावग्रस्त आणि यांत्रिक झाली आहे. बुद्धांचे ध्यान, सम्यक स्मृती, मन:शांतता आणि प्रज्ञेचे तत्त्व आज जागतिक मानसिक आरोग्य चळवळीचे आधार आहे. जागरूकता, ध्यान, भावनिक बुद्धिमत्ता (mindfulness, meditation, emotional intelligence) यांचा उगम हा बोधीच्या तत्त्वज्ञानातच आहे.बोधी दिन आपल्याला पर्यावरणीय जाणीव देखील शिकवतो. बुद्धांनी निसर्गासोबत संघर्ष नव्हे, तर सह-अस्तित्व सुचवले. आज पृथ्वीला हवामान बदल, प्रदूषण, जैवविविधतेचा ऱ्हास, नद्यांचा मृत्यू, जंगलांचा विनाश आणि प्राणी-मानव संघर्ष या समस्या भेडसावत आहेत. अशावेळी "सर्व प्राणी माझेच आहेत" हा बुद्धांचा संदेश आजच्या पर्यावरणीय नैतिकतेचा मूळ पाया ठरतो. याच अर्थाने बोधी दिन हा केवळ स्मरणदिन नाही तर तो सततच्या आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. बुद्धांनी सांगितले की मनुष्याचे दुःख भाग्याने नव्हे, तर त्याच्या विचारांनी आणि कृतींनी निर्माण होते. म्हणून बदल हवा असेल तर तो आतून सुरू झाला पाहिजे.आजच्या काळात बोधी दिनाचा संदेश जगभराला एका नव्या सामाजिक कराराची गरज सांगतो तो संदेश म्हणजे, जिथे धर्म हिंसा नव्हे, संवाद निर्माण करतो. जिथे तंत्रज्ञान मानवतेची परिपूर्ती करतो. जिथे समीक्षाशील विचार आणि करुणा एकत्र येतात. जिथे समाज फक्त विकसित नसतो, तर मनानेही सभ्य असतो. या अर्थाने बोधी ही स्वतःमध्ये एक अंतरिक क्रांती आहे. ती जीवनाच्या संघर्षांना टाळणारी नाही, तर त्या संघर्षांचे स्वरूप समजून शांततेने त्यावर उत्तर शोधणारी आहे. बोधी दिन ही एक जाणीव आहे की जग बदलण्यासाठी पहिले पाऊल म्हणजे स्वतःला बदलणे होय.आज ८ डिसेंबरच्या या दिवशी आपण सर्वांनी स्वतःला विचारावे की "आपण जागृत आहोत की फक्त जागे आहोत?"कारण बुद्धांच्या मते, मनुष्य जन्माला येतो, पण मानव बनण्यासाठी त्याला विवेक, करुणा, दया आणि समता अंगीकारावी लागते. बोधी दिन आपल्याला एकच संदेश देतो की, शांती ही बाह्य मिळकत नाही; ती अंतर्मनातून उगम पावलेली प्रज्ञा आहे. आणि हीच प्रज्ञा समाजाला न्याय्य, समतामूलक, शोषणमुक्त आणि सौहार्दपूर्ण बनवू शकते. म्हणून आजच्या या पवित्र दिवशी आपण फक्त स्मरण नव्हे तर अनुकरण करण्याचा संकल्प करूया. कारण जेव्हा प्रत्येक मानव बोधी होईल, तेव्हा जगात खऱ्या अर्थाने सुंदरता, शांती आणि मानवता नांदेल.


**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्र, पाली आणि बुद्धीझमचे अभ्यासक आहेत)

मो. ९९६०१०३५८२

bagate.rajendra5@gmail.com



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002